**सन २०२५ मध्ये दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोविंदांना विमा संरक्षण देणेवावत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः-संकीर्ण ३०२५/प्र.क्र.१११/क्रीयुसे-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-४०० ०३२
दि. २३/०७/२०२५

**वाचाः-**१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. विकाक२८१५/प्र.क्र.८/क्रीयुसे-१, दि.११.०८.२०१५
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. विकाक२८१५/प्र.क्र.८/क्रीयुसे-१, दि.२४.०८.२०१६
३) शासन परिपत्रक, महिला व बालविकास विभाग, क्र. पीआयएल २०१६/प्र.क्र.५५/ का.०३. दि.२४.०८.२०१६
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.विकाक ३०२२/प्र.क्र.८१२६/ क्रीयुसे-१, दि.१८.०८.२०२२
५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औपधी द्रव्ये विभाग, क्र. वैशिवि२०२२/प्र.क्र.१६७/ प्रशा-२. दि.१९.०८.२०२२.
६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१९८/आरोग्य-३, दि.१९.०८.२०२२.
७) शासन निर्णय, शालेश शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.विकाक३०२३/प्र.क्र.११३/ क्रीयुसे. १, दि.१८.०८.२०२३.
८) शासन निर्णय, शालेश शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संकीर्ण ३०२४/प्र.क्र.११७/ क्रीयुसे.१,दि.२५.०७.२०२४.

**प्रस्तावना:-**

दहीहंडी उत्सवामधील सहभागी गोविंदाना मानवी मनोरे रचताना अपघात/दुर्घटना होण्याची शक्यता असते. काही वेळा गोविंदा पथकातील गोविंदाचा दुर्दैवी अपघाती मृत्यू घडून येतो किंवा गंभीर दुखापत होऊन जीवाला धोका निर्माण होतो. परिणामी अपघातग्रस्त गोविंदाना व त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागते.

२. दहीहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचून दहीहंडी फोडण्याच्या आयोजनाबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.५६/२०१४ प्रकरणी मा. उच्च

न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या अनुक्रमे दि.११.०८.२०१४ व दि.१७.०८.२०१६ च्या आदेशाच्या अनुषंगाने दहीहंडी उत्सवादरम्यान गोविंदाच्या मानवी मनोरे रचण्याच्या प्रकारास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये साहसी खेळाचा दर्जा देणेबाबत व गोविंदा उत्सवाच्या आयोजनाच्यावेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या उपायोजनांसंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मानवी मनोरे उभारण्याच्या खेळ प्रकारास साहसी क्रीडा प्रकाराचा दर्जा देण्याच्या या क्रीडा प्रकारावावत राज्य संघटनेमार्फत विस्तृत नियमावली तयार करण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आले आहेत. संदर्भ क्र. ५ व ६ येथील शासन निर्णयान्वये दहीहंडी उत्सवादरम्यान अपघातग्रस्त होणाऱ्या गोविंदांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व शासकीय / निमशासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करणेवावत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णयान्वये सन २०२४ मध्ये दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या ७५,००० गोविंदाना विमा संरक्षण देण्यास मान्यता देण्यात आली होती. उत्सवाची लोकप्रियता व गोविंदांची वाढती संख्या विचारात घेता, सन २०२५ मध्ये दहीहंडी उत्सवा दरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या राज्यातील १,५०,००० गोविंदांना विमा संरक्षण देण्याची वाव शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णयः-**

दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या राज्यातील १,५०,००० गोविंदांना खालीलप्रमाणे विमा संरक्षण देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विवरण | विमा संरक्षण |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रु.१०,००,०००/-(दहा लक्ष) |
| २ | दोन अवयव किंवा दोन डोळे गमावल्यास | रु.१०,००,०००/- (दहा लक्ष) |
| ३ | एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास | रु.५,००,०००/- (पाच लक्ष) |
| ४ | कायमस्वरुपी पूर्ण अपंगत्व (Permanent total disablement) | रु.१०,००,०००/- (दहा लक्ष) |
| ५ | कायम अपूर्ण/पक्षपाती अपंगत्व (Permanent partial disablement) | विमा पॉलिसीमध्ये नमूद केलेल्या टक्केवारीनुसार |
| ६ | अपघातामुळे रुग्णालयीन खर्च | प्रत्यक्षात झालेला खर्च किंवा जास्तीत जास्त रु.१,००,०००/- (एक लक्ष) |

२.	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन कमीत-कमी विमा हप्त्याचा प्रस्ताव सादर करणाऱ्या शासकीय विमा कंपनीची निवड करावी. तसेच अनुषंगिक बाबींसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी.

३.	सदर विमा संरक्षण योजनेसंबंधीच्या अटी, शर्ती व अन्य तरतुदी सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे राहतील. सदर अटी व शर्ती तसेच संबंधित विमा कंपनीने विहित केलेल्या अटी / शर्ती लागू राहतील.

४.	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी संबंधित विमा कंपनीसोबत चर्चा करुन विमा संरक्षणाचा योग्य कालावधी निश्चित करावा.

५.	महाराष्ट्र राज्य गोविंदा असोसिएशन, अंधेरी(पूर्व), मुंबई या संस्थेने दहीहंडी उत्सवासाठी सराव व प्रशिक्षण असणाऱ्या, वयाची अट पूर्ण करणाऱ्या व प्रत्यक्षात भाग घेणाऱ्या गोविंदांची नोंदणी करुन माहिती तपासून व प्रमाणित करुन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना सादर करावी. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी नोंदणी झालेल्या गोविंदांच्या संख्येनुसार विमा हप्त्याची रक्कम /निधी विमा कंपनीला अदा करावी.

६.	यावर होणारा खर्च राज्य क्रीडा विकास निधीतून भागविण्यात येईल.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२५०७२३१८३८५२९०२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL PANDURANG PANDHARE

Digitally signed by SUNIL PANDURANG PANDHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Scl Edu Sports Dept, 2.5.4.20=7F874792415B92BA519384CACB41B53A89CF93DBD96D4BE1F7D97FB6326EED47, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B7DC58E83C9774E4419A7AEEAC77EAE7CDEA272D759DFB29451BCFE7E3F04C9, cn=SUNIL PANDURANG PANDHARE
Date: 2025.07.24 11:58:30 +05'30'

**(सुनिल पांढरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे प्रधान सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५. मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे विशेष कार्य अधिकारी,
६. सर्व मा. मंत्री यांचे स्वीय सहायक,
७. सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र नागपूर
११. महालेखापाल (लेखा परीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई

१३. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
१४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
१५. सर्व विभागीय आयुक्त,
१६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे
१७. सर्व जिल्हाधिकारी
१८. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिपद
२०. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२१. सर्व अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय / दंत विद्यालये व रुग्णालये
२२. सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे
२३. सर्व उप संचालक, क्रीडा व युवक सेवा
२४. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा
२५. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिपद,
२६. सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये,
२७. संचालक, लेखा व कोपागारे, मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३०. सर्व जिल्हा कोपागार अधिकारी मंत्रालय, मुंबई
३१. महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई
३२. निवडनस्ती (क्रीयुसे-१)

**शासन निर्णय, शा. शि. व क्री. वि., क्र. संकीर्ण-३०२५/प्र.क्र.१११/क्रीयुसे-१, दि. २३.०७.२०२५ सोबतचे सहपत्र**

## परिशिष्ट-अ

दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे तयार करतांना दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोविंदांना विमा सरंक्षण देण्यासंदर्भातील अटी व शर्ती:-

(१) महाराष्ट्र राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या दहीहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचण्यासाठी प्रत्यक्ष सहभागी असलेल्या अपघातग्रस्त गोविंदांना सदर विमा सरंक्षण अनुज्ञेय राहील. याकरिता महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडून सराव व प्रशिक्षण असणाऱ्या, वयाची अट पूर्ण करणाऱ्या व प्रत्याक्षात भाग घेणाऱ्या गोविंदाची माहिती तपासून व प्रमाणित करुन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर गोविंदांच्या संख्येनुसार विमा हप्ता रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडून संबंधित विमा कंपनीला अदा केली जाईल.

(२) गोविंदांच्या विमा संरक्षणाचा कालावधी हा आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी संबंधित विमा कंपनीसोबत चर्चा करुन अंतिमत: निश्चित केल्यानुसार राहील.

(३) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करणाऱ्या आयोजक संस्थेने, सदर आयोजनाकरिता स्थानिक प्रशासनाच्या तसेच अन्य विहित प्राधिकारी यांच्या आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक राहील.

(४) दहीहंडी आयोजनासंदर्भात मा. न्यायालय, शासन, स्थानिक प्रशासन, पोलिस यंत्रणा इ. कडून वेळोवेळी देण्यात आलेल्या/येणाऱ्या सूचनांचे/आदेशांचे पालन करणे आयोजक संस्था तसेच सहभागी गोविंदा पथकांना/संस्थांना बंधनकारक राहील.

(५) दहीहंडी उत्सवाचे आयोजन करणाऱ्या संस्थेने, सहभागी गोविंदांच्या सुरक्षेविषयी आवश्यक सर्व प्रकारच्या उपाययोजना कराव्यात.

(६) दहीहंडी उत्सवादरम्यान मानवी मनोरे रचण्यासाठी सहभागी झालेल्या गोविंदांना अपघात होऊन अशा गोविंदांचा मृत्यू/दुखापत झाल्यास, त्यांना विमा संरक्षण अनुज्ञेय राहील. मानवी मनोरे तयार करण्याव्यतिरिक्त अन्य कारणांमुळे अपघात / दुर्घटना झाल्यास सदर विमा सरंक्षण अनुज्ञेय असणार नाही.

(७) दहीहंडी उत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या गोविंदांवावत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार विहीत केल्यानुसार गोविंदांच्या किमान वयोमर्यादेचे पालन करणे बंधनकारक राहील.

(८) दहीहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचतांना अपघात झाल्यास गोविंदांना तात्काळ वैद्यकीय मदत देण्याबाबत आयोजकांनी स्थानिक प्रशासनाच्या सहाय्याने आवश्यक ती कार्यवाही करावी.

(९) दहीहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचतांना झालेल्या अपघाताबाबत आयोजकांनी तात्काळ स्थानिक प्रशासन तसेच संबंधित पोलिस यंत्रणा, महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई या समितीकडे व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

(१०) मानवी मनोरे रचण्याच्या प्रकारास (खेळास) साहसी खेळाचा दर्जा देण्यात आलेला आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे एकविध खेळांच्या संघटनांनी विविध स्तरावर स्पर्धा आयोजित करणे व नियमावली करणे व त्या नियमावलीनुसार स्पर्धेचे आयोजन करणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे दहीहंडी उत्सव स्पर्धा आयोजनाकरिता विविध स्तरावर या साहसी खेळांच्या संघटना स्थापन करणे व त्याद्वारे या साहसी खेळाचे नियम व अटी, स्पर्धापद्धती व उपक्रम याबाबत आयोजनासंदर्भात विस्तृत व स्वयंस्पष्ट नियमावली तयार करणे आवश्यक आहे.

(११) शासनामार्फत विविध क्रीडा संघटनांना स्पर्धा आयोजनाकरिता नियमानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यासंदर्भात क्रीडा विभागाकडे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने या स्पर्धेचे आयोजन सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्या माध्यमातून करण्यात यावे.

XXX